**राज्यात जलयुक्त शिवार अभियान /जल व मृद संधारणाची कामे करण्यासाठी जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स) यंत्रसामुग्री व्याज अर्थसहाय्य योजना सुरू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्र.जशिअ-२०१७/ प्र.क्र.५२२ /जल-७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई-३२
दि. ०२ जानेवारी, २०१८.

**प्रस्तावना :-**

राज्यात जलयुक्त शिवार अभियान /जल व मृद संधारणाची कामे करण्यासाठी सुशिक्षीत बेरोजगार तरुण/शेतकरी उत्पादन संस्था / नोंदणीकृत शेतकरी गटास / बेरोजगारांची सहकारी संस्था / विविध कार्यकारी संस्था यांना शासनाकडुन सहाय्य योजना सुरू करण्याबाबत “जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स)यंत्र सामुग्री व्याज अर्थसहाय्य योजना” सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. जलसंधारण विभागातील कामकाजाचा आढावा घेण्याकरीता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. २१ जुलै, २०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये जलसंधारण व सहकार विभागाने या प्रस्तावावर कार्यवाही करण्याचे निदेश मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आहेत. त्यानुसार उत्खनन यंत्र सामुग्री (अर्थमुव्हर्स) खरेदी करण्यासाठी वित्तीय संस्थाकडून कर्ज उपलब्ध करुन, अशा उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाचे दायित्व शासनातर्फे अदा करण्याची योजना सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

राज्यात जलयुक्त शिवार अभियान /जल व मृद संधारणाची कामे करण्यासाठी यंत्र सामुग्री उपलब्ध करण्याकरीता सुशिक्षीत बेरोजगार तरूण / बेरोजगारांची सहकारी संस्था / नोंदणीकृत गट शेती/ शेतकरी उत्पादन संस्था/विविध कार्यकारी संस्था यांना शासनाकडुन मृद व जलसंधारण विभाग, सहकार विभाग व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांच्या माध्यमातुन “जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स) यंत्र सामुग्री व्याज अर्थसहाय्य योजना” सुरू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांची या योजनेकरीता नोडल एजन्सी म्हणुन नियुक्ती करण्यात येत आहे. प्रथम टप्यामध्ये या योजनेचा कालावधी दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत राहील व योजनेस मिळणारा प्रतिसाद आणि राज्यात उपलब्ध होणाऱ्या यंत्रांची संख्या विचारात घेवून या योजनेचा कालावधी वाढवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. या योजनेतंर्गत लाभार्थ्यांना आवश्यक प्रशिक्षण देऊन त्यांना उत्खनन यंत्रसामुग्री (अर्थमुव्हर्स) खरेदी करण्यासाठी वित्तीय संस्थाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कर्जावरील व्याजाचे दायित्व शासनातर्फे अदा करण्यात येणार आहे.

२. **योजनेची ठळक वैशिष्टे.**

१. पात्र लाभार्थ्यास/संस्थेस बँक / वित्तीय संस्थेकडून उत्खनन यंत्र सामुग्री कर्ज मंजूर करण्यात येईल व अशा कर्जाची कमाल मर्यादा रु. १७.६० लाख असेल.

२. अशा उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कर्जाकरीता वित्तीय संस्थांकडुन प्रचलित व्याजदरानुसार व्याजाची आकारणी करण्यात येईल व शासनाकडून सदर आकारण्यात

येणाऱ्या व्याजाचा परतावा संबधित वित्तीय संस्थांना करण्यात येईल. व्याजदराच्या परताव्याची रक्कम निश्चित करण्याकरीता कमाल मर्यादा सरळ व्याज पध्दतीने कमाल दर १२% इतका राहील.

३. वित्तीय संस्थामार्फत मंजुर करण्यात येणाऱ्या कर्जाचा परतावा कालावधीची मुदत कमाल पाच वर्ष इतकी असेल. तथापि लाभार्थ्यास कर्जाची मुदतीपुर्वी परतफेड करण्यास अनुमती असेल. अशा प्रकरणी कर्ज परतफेडीच्या दिनांकापर्यंत येणारी व्याजाची रक्कम शासनामार्फत अदा करण्यात येईल.

४. प्रथम टप्यामध्ये या योजनेचा कालावधी दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत ठेवण्यात येत असून योजनेस मिळणारा प्रतिसाद आणि राज्यात उपलब्ध होणाऱ्या यंत्रांची संख्या विचारात घेवून या योजनेचा कालावधी वाढवण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. प्रथम टप्यातील लाभार्थ्यांची निवड दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत करण्यात येईल.

५. लाभार्थ्यांस त्याच्या गरजेनुसार उत्खनन यंत्र सामुग्री (अर्थमुव्हर्स) खरेदी करण्याची मुभा असेल यामध्ये Backhoe loader & Excavator (Tyre असलेले) व Excavator (Chain असलेले) या वर्गातील यंत्रसामुग्री अनुज्ञेय असून यंत्रसामुग्रीची किमान अश्वक्षमता ७० HP पेक्षा अधिक राहील. मात्र शासनाकडुन अनुज्ञेय असलेल्या व्याजाच्या परताव्याच्या रक्कमेकरीता कर्जाच्या रक्कमेची कमाल मर्यादा रू. १७.६० लक्ष राहील. त्यानुसार ५ वर्षामध्ये शासनामार्फत कमाल व्याज परतावा रक्कम रु.५.९० लक्ष इतकी अनुज्ञेय राहील. रू.१७.६० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेवरील व्याजाच्या येणाऱ्या रक्कमेचा परतावा शासनाकडुन अनुज्ञेय नसेल. सदरची येणारी अतिरीक्त व्याजाची रक्कम अदा करण्याची जबाबदारी ही लाभार्थ्याची असेल.

६. लाभार्थ्यांने स्वत:चा हिस्सा म्हणुन किमान २० टक्के रक्कम उभारणे **आवश्यक** आहे.

७. वित्तीय संस्थेने दिलेल्या कर्जाच्या वसुलीच्या हप्त्यातील येणारी मुळ कर्जाची रक्कम लाभार्थ्यांने अदा करावयाची असुन अशा कर्ज वसुलीच्या हप्त्यातील व्याजाचा हिस्सा / व्याजाची येणारी रक्कम शासनामार्फत अदा करण्यात येईल. शासनाकडुन अदा करण्यात येणारी व्याजाची रक्कम अदा करण्यास काही कारणामुळे विलंब झाल्यास, अशा विलंब कालावधी करीता येणारी अतिरीक्त विलंब व्याज रक्कम शासनाद्वारे अदा करण्यात येईल.

८. या योजनेतंर्गत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कर्जाकरीता लाभार्थ्याकडून कोणाताही हप्ता थकल्यास अशा थकीत हप्त्यासाठी शासनाकडून व्याज देय असणार नाही. मात्र लाभार्थ्यांनी थकीत हप्त्याची परतफेड केल्यानंतर थकीत हप्त्यावरील दंडनीय व्याज वगळता उर्वरित व्याज तसेच पुढील हप्त्यासाठी सदर योजनेचा लाभ देय राहील.

९. या योजने अंतर्गत उत्खनन यंत्रसामुग्री (अर्थमुव्हर्स) खरेदी करणाऱ्या लाभार्थ्यास शासकीय कामे उपलब्ध करुन देण्याची कोणतीही हमी शासनाची असणार नाही. मात्र जलसंधारण विभागाकडून करण्यात येणारे जलसंधारण /मृद संधारणाचे उपचार कामांना व पाणंद रस्ते याकरिता उत्खनन यंत्रसामुग्री (अर्थमुव्हर्स) आवश्यकता असल्यास या योजनेतंर्गत त्या त्या क्षेत्रातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रचलीत शासकीय दराने जिल्ह्यामध्ये काम करण्याबाबत जिल्हास्तरीय

समितीने निर्देश दिल्यास त्या दराने काम करणे लाभार्थ्यास आवश्यक राहील. निर्देशाप्रमाणे लाभार्थ्याने काम करण्यास टाळाटाळ करीत असल्याबाब जिल्हास्तरीय समितीची खात्री झाल्यास समिती तशी बाब महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या निदर्शनास आणून देईल व त्या वर्षाकरिता लाभार्थी व्याज अनुदानास पात्र असणार नाही.

१०. या योजने अंतर्गत जिल्हानिहाय लाभार्थींची संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. या बाबतचे विवरणपत्र सोबत परिशिष्ट "अ" नुसार जोडण्यात आले आहे.

११. या योजनेतंर्गत लाभार्थ्यास कर्ज मंजूरीच्या निकषानुसार कर्ज मंजूर करणे व मंजूर करण्यात येणाऱ्या कर्जाची रक्कम वसुल करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत बँक / वित्तीय संस्थेची राहील.

१२. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ यांची या योजनेकरीता नोडल एजन्सी म्हणुन नियुक्ती करण्यात येत असून त्यासाठी महामंडळास योजनेवर होणाऱ्या खर्चाच्या २% इतके प्रशासकीय शुल्क अदा करण्यात येईल.

३. **लाभार्थी प्राधान्यक्रम.**

१. सुशिक्षित बेरोजगार.
२. शेतकरी उत्पादक कंपनी.
३. बेरोजगारांची सहकारी संस्था.
४. नोंदणीकृत गट शेती.
५. विविध कार्यकारी सहकारी संस्था.

लाभार्थ्याकडे स्वत:च्या मालकीचे परिच्छेद क्र.५ मध्ये नमूद केलेली यंत्रसामुग्री नसावी.

४. **लाभार्थी निवड समिती.**

या योजनेतंर्गत लाभार्थ्यांची पात्रतेसाठी निवड करण्यास शिफारस करण्यासाठी प्रत्येक जिल्हास्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तथा जिल्हा मृद संधारण अधिकारी | - | अध्यक्ष |
| कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी | - | सदस्य |
| जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था | - | सदस्य सचिव |

५. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था / समिती / वित्तीय संस्था यांची जबाबदारी. सदर योजनेची अंमलबजावणी सहकार विभागातंर्गत कार्यरत असलेल्या महाराष्ट्र सहकार विकास महामंडळामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत असुन सदर महामंडळाची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था तथा समितीचे सदस्य सचिव यांचेकडे खाली नमुद केल्यानुसार कामांची जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

१. या योजनेतंर्गत पात्र लाभार्थ्यांकडून Online अर्ज मागविण्याकरीता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था तथा समितीचे सदस्य सचिव यांचेमार्फत जिल्हास्तरावर योजनेस जाहीर प्रसिध्दी देण्यात यावी व प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करून सदस्य सचिव

यांनी समिती समोर सादर करावेत. ही कार्यवाही अर्ज स्वीकारण्याच्या मुदतीनंतर ७ दिवसात पुर्ण करावी.

२. समितीने कर्ज मंजुरीकरीता प्राप्त उद्दीष्टांच्या दुप्पट शिफारस केलेल्या/ पात्र केलेल्या अर्जदारांबाबतची सुची संबधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सदस्य सचिव) यांनी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे यांना सादर करावी.

३. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने जिल्हा समितीने शिफारस केलेल्या अर्जदारांची नावे महामंडळाने निश्चित केलेल्या निकषांनुसार अंतिम करून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचे कडे परत करावी.

४. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी अशी यादी त्यांचे कार्यालयाबाहेर तसेच जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाबाहेर प्रसिध्द करून संबधित अर्जदारांना कळवावे.

५. सदर यादी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडील अधिकृत परवाना धारक असलेल्या जिल्हयातील सर्व बँका व वित्तीय संस्था यांना देखील पाठवावी.

६. कर्ज मंजुरीबाबतचे संपुर्ण अधिकार हे संबधित बँक /वित्तीय संस्थांचेच राहणार असुन या संदर्भातील बँकेच्या /वित्तीय संस्थेच्या असणाऱ्या संपुर्ण अटी व शर्ती यांची पुर्तता करण्याची जबाबदारी लाभार्थी यांचेवर राहील.

७. जिल्हा स्तरीय निवड समितीने शिफारस केलेल्या लाभार्थ्यांची कर्ज परतफेडची क्षमता आणि इतर अनुषंगिक बाबी विचारात घेऊन वित्तीय संस्थेने कर्ज मंजूरी बाबत निर्णय घ्यावा.

**६. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाची जबाबदारी.**

१. वित्तीय संस्थेने लाभार्थीस कर्ज मंजूर केल्यानंतर कर्जाचे वितरण करण्यापुर्वी संबधित वित्तीय संस्था, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ व लाभार्थी यांच्यामध्ये त्रिपक्षीय सामंजस्य करार (MOU) करण्यात यावा.

२. लाभार्थ्यांना वित्तीय संस्थाकडुन उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कर्जावरील शासनामार्फत अनुज्ञेय असलेली व्याज परतफेडीची रक्कम संबधित वित्तीय संस्थांकडे वेळच्या वेळी उपलब्ध करून दयावी.

३. अर्थमुव्हींग मशिन्स खरेदी करण्यासाठी वित्तीय संस्थांकडून कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

४. योजने संदर्भात लाभार्थी / संबधित वित्तीय संस्था / राज्य शासन यांच्यामध्ये समन्वयन करावे.

५. या योजनेतंर्गत पात्र लाभार्थ्यांना अर्थमुव्हींग मशिन्स संदर्भात राज्य शासनाच्या कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून प्रशिक्षण आयोजित करावे.

६. योजनेचे दैनंदिन कार्यान्वयन करुन प्रगतीबाबत / सद्यस्थितीबाबत मासिक अहवाल पुढील महिन्यातील १० तारखेपर्यंत शासन सादर करावे.

७. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळास नोडल एजन्सी म्हणुन करण्यात येणाऱ्या कामाकरीता योजनेवर होणाऱ्या शासकीय खर्चाच्या २% रक्कम ही शुल्क /प्रशासकीय शुल्क म्हणुन अनुज्ञेय राहील.

८. या योजनेच्या अमलबजावणीच्या अनुषंगाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे, अर्थ मुव्हींग मशीन्स खरेदी केलेल्या लाभार्थ्यांना शासनाच्या विविध यंत्रणांकडून उपलब्ध होणाऱ्या कामांचे दर निश्चित करण्याचे अधिकार तसेच इतर अनुषंगिक बदल करण्याचे अधिकार मृद व जलसंधारण विभागाकडे असतील.

९. सदर शासन निर्णय सहकार विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे २४/२-स दिनांक २४.१०.२०१७, १७७/१४३४ दिनांक २७.११.२०१७, व ५७४/ २०१७/व्यय-१५, दिनांक ४.१२.२०१७ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०१०३११२२०२०५२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Eknath Rajaram Dawale

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cf c838f362fdbb58c58e7b, cn=Eknath Rajaram Dawale
Date: 2018.01.03 13:08:02 +05'30'

**(एकनाथ डवले)**
सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति :-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य,
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८.अपर मुख्य सचिव (कृषी),कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई
१०.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुर्नवसन), मंत्रालय, मुंबई,
११.आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, पुणे-४११००१.
१२. आयुक्त, (सहकार) मध्यवर्ती, पुणे
१३.विभागीय आयुक्त (सर्व)
१४.आयुक्त (मृद व जलसंधारण ), वाल्मी, औरंगाबाद.

१५.सर्व जिल्हाधिकारी.

१६.संचालक (मृदसंधारण),कृषि आयुक्तालय, पुणे-४११००१.

१७.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) , पुणे.

१८. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे,

१९. संचालक,महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

१७ .संचालक, भूजल व सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे

१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.

## प्रपत्र - अ

| जलसमृध्दी (अर्थमुव्हर्स ) यंत्रसामुग्री व्याज अनुदान योजना | | |
|---|---|---|
| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | उद्दिष्ट |
| १ | २ | ३ |
| १ | गडचिरोली | ५० |
| २ | गोंदिया | ५० |
| ३ | नांदेड | ५० |
| ४ | अकोला | ५० |
| ५ | हिंगोली | ५० |
| ६ | यवतमाळ | ५० |
| ७ | परभणी | ४० |
| ८ | बुलढाणा | ४० |
| ९ | अमरावती | ४० |
| १० | वर्धा | ४० |
| ११ | नंदुरबार | ४० |
| १२ | सिंधुदूर्ग | ४० |
| १३ | सांगली | २५ |
| १४ | चंद्रपूर | २५ |
| १५ | रत्नागिरी | २५ |
| १६ | धुळे | २५ |
| १७ | भंडारा | २५ |
| १८ | बीड | २५ |
| १९ | लातूर | २५ |
| २० | वाशिम | २५ |
| २१ | जळगाव | २५ |
| २२ | उस्मानाबाद | २५ |
| २३ | सोलापूर | २५ |
| २४ | जालना | २५ |
| २५ | सातारा | २५ |
| २६ | औरंगाबाद | १५ |
| २७ | अहमदनगर | १५ |
| २८ | पालघर | १५ |
| २९ | नाशिक | १५ |
| ३० | नागपूर | १५ |
| ३१ | कोल्हापूर | १५ |
| ३२ | रायगड | १५ |
| ३३ | पुणे | १५ |
| ३४ | ठाणे | १५ |
| | **एकूण** | **१०००** |